**नि. फौ. ख. क्र.५७५/२०२३**

सरकार वि. इमरान कुरेशी

**नि.क्र.१८**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– नागेश हिरामन बोरगे ,</u>**

वय– ३४ वर्षे, व्यवसाय–खाजगी नोकरी,

रा. निमसाखर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.१०/०९/२०२२ रोजी मी वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे होमगार्ड होतो. पो.उप.निरीक्षक टेळकीकर यांचेसोबत बंदोबस्त लागला होता. टेळकीकर यांना बातमी मिळाली की, लासुर्णे गावात राजवाडयाशेजारी दोन गायी व चौदा वासरांची पिल्ले आहेत. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनमधून निघालो. घटनास्थळावर गेलो व चौकशी केली. त्यावेळी आम्हाला इमरान कुरेशी यांचे असल्याचे समजले. रात्री ०३.०० वाजता आरोपीला उठवले. एम.एच.४२ ए.क्यू.५४४९ या वाहनात दोन गायी होत्या व शेजारच्या आवारात चौदा पिल्ले होती. आरोपीने जनावराबाबत समाधानकारक उत्तर दिले नाही. म्हणून त्यांना पोलीस स्टेशनला घेवून गेलो. म्हणून आरोपीविरुध्द बेलदार यांनी फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.एम.पी.लोंढे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. मी निमसाखर येथे राहतो. दि.१०/०९/२०२२ रोजी रात्री ०३.०० वाजता गस्त घालण्यासाठी गेलो होतो. फोन मला आला नाही. टेळकीकर यांचेशी काय बोलणे झाले मला माहिती नाही. वरिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे मी घटनास्थळावर गेलो.

घटनेच्या ठिकाणी अंधार होता. घटनास्थळावर जुना पुणे – इंदापूर रस्ता आहे. तेथे अतिक्रमण झालेली घरे आहेत. घराशेजारी गार्यींचे गोठे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर मी त्या ठिकाणी परत गेलो नाही. पोलीसांनीच गायी आरोपीच्या असल्याचे मला सांगितले. घटनास्थळावर इतर कोणतीही गाडी नव्हती. घटनास्थळावर कम्पाऊंड केलेले काही दिसत नाही. पोलीस स्टेशनला स्टेशन डायरीला छाप्याची नोंद केली होती. जनावरे कोणत्या अवस्थेत आहेत हे मी पाहिले नाही. कोणी आरोपीचे नाव सांगितले मला माहिती नाही. वाहन हे अंधारात एका बाजूला लावलेले होते. वाहन कोणाचे आहे याची चौकशी केली नाही. मला वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे काम करावे लागते. जनावरे कोणी आणली हे मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.२३/१२/२०२५**